# ६२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवासाठी चित्रपट निर्मिती संस्थानी भरावयाच्या प्रवेशिकेचा नमुना

१. चित्रपटाचे शिर्षक :- ------------------------------------------------------------

२. चित्रपट पूर्ण लांबीचा आहे काय? :- ------------------------------------------------------------

३. चित्रपटाचा कालावधी :- ------------------------------------------------------------

४. निर्मिती संस्थेचे नाव :- ------------------------------------------------------------

५. निर्मात्याचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------

:- ------------------------------------------------------------

:- ------------------------------------------------------------

ई-मेल :- ------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक :- ------------------------------------------------------------

६. निर्मात्याचे प्रथम पदार्पण आहे काय? :- ------------------------------------------------------------

७. दिग्दर्शकाचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------

:- ------------------------------------------------------------

:- ------------------------------------------------------------

ई-मेल :- ------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक :- ------------------------------------------------------------

८. दिग्दर्शकाचे प्रथम पदार्पण आहे काय? :- ------------------------------------------------------------

९. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने प्रदर्शित करण्यासाठी दिलेल्या शिफारसपत्राचा क्रमांक व दिनांक (प्रमाणित केलेली सत्यप्रत सोबत जोडावी) :- ------------------------------------------------------------

१०. चित्रपट सार्वजनिकरित्या प्रदर्शित झाले आहे काय? :- ------------------------------------------------

असल्यास, प्रदर्शनाची जागा व दिनांक : - ------------------------------------------------

११. आपला चित्रपट दुसऱ्या चित्रपटपटावरून डब केलेला आहे, दुसऱ्या चित्रपटावर आधारित आहे :- ------------------------------------------------

किंवा त्यांच्यावरून तो पुन्हा तयार केला आहे काय
त्याचे कृपया नाव देणे.

१२ चित्रपटाची कथा स्वतंत्र आहे, रुपांतरित आहे वा :- -------------------------------------------------
आधारित असल्यास, ज्या मूळ कथेवरून
(नाटक, कांदबरी, लघुकथा इ.) ती घेतली असेल त्या
कथेचे व त्या लेखकाचे नाव.

१३. **चित्रपटात प्रमुख भूमिका करणाऱ्या कलाकरांची संपूर्ण यादी २५ प्रतीत खालील नमुन्यात वेगळया कागदावर देण्यात यावी. अभिनेता / अभिनेत्री यांची या चित्रपटात प्रथम पदापर्ण भूमिका असेल तर तसा स्पष्ट उल्लेख यादीत असावा. सदर यादी चित्रपटाच्या प्रिन्टसोबत पाठवावी.**

| भूमिका<br><br>(१) | कलाकाराचे चित्रपटातील नाव<br><br>(२) | कलाकाराचे पूर्ण नाव<br><br>(३) | कलाकराचा पूर्ण पत्ता<br>ई-मेल, भ्रमणध्वनी क्रमांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

टिप:- ही प्रवेशिका भरल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मार्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ६५ यांच्याकडे पाठवावी.

१४. खालील विभागातील तंत्रज्ञांची त्यांच्या नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांकासह माहिती प्रवेशिकेसोबत जोडण्यात यावी.

| **क्र.** | **विभाग** | **नाव** | **पत्ता** | **मोबाईल नं** | **ई-मेल** |
|---|---|---|---|---|---|
| १ | कथा लेखक | | | | |
| २ | पटकथा लेखक | | | | |
| ३ | गीत लेखक | | | | |
| ४ | संवाद लेखक | | | | |
| ५ | संगीत दिग्दर्शन | | | | |
| ६ | पार्श्वसंगीत (बॅक ग्राऊंड म्युझिक) | | | | |
| ७ | ध्वनी संयोजन (साऊंड इफेक्ट) | | | | |
| ८ | छायालेखक | | | | |
| ९ | ध्वनीमुद्रक | | | | |
| १० | ध्वनि संयोजक | | | | |
| ११ | संकलन | | | | |
| १२ | कला दिग्दर्शक | | | | |
| १३ | पार्श्वगायक | | | | |
| १४ | पार्श्वगायिका | | | | |
| १५ | वेशभूषाकार | | | | |
| १६ | रंगभूषाकार | | | | |
| १७ | नृत्य दिग्दर्शक | | | | |
| १८ | बालकलाकार | | | | |

१५. प्रवेशिक सादर करणारी व्यक्ती निर्माती नसेल तर त्या व्यक्तीस निर्मात्यांनी प्रवेशिका देण्यास संमती दिला आहे काय? सोबत अधिकारपत्र जोडावे. :- -------------------------------------------

मी/ आम्ही प्रतिज्ञापुर्वक सांगतो की, वर दिलेली माहिती बरोबर आणि खरी आहे.
मी/ आम्ही प्रतिज्ञापुर्वक सांगतो की, महोत्सवाचे नियम आणि अटी मला/आम्हाला मान्य आहे.
मी/ महोत्सवाचे नियम पाळण्याचे अभिवचन देतो.

स्थळ :-------------------------------------------
दिनांक :-------------------------------------------
संपुर्ण पत्ता :-------------------------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------

प्रवेशिका पाठविणाऱ्या संस्थेच्या अधिकृत व्यक्तीची फोन नंबर व नावासह स्वाक्षरी

**टिप:-** प्रवेशिकेसोबत चित्रपटाची सेन्सॉर प्रमाणपत्राची छायांकित प्रत २५ प्रती कलाकार व तंत्रज्ञ यादी २५ प्रती सह, पोस्टर २५ प्रती सह ,फॉर्मच्या २५ प्रती गीते २५ प्रति (प्रत्येक गीतातील गाण्याच्या बोलासह), कथासार (२५प्रति मराठी व १० प्रती इंग्रजी) चित्रपट शुटिंगच्या वेळीचे स्टील फोटो सोबत जोडावे (किमान १० फोटो)

# महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे नियम व अटी

१. मराठी चित्रपट व्यवसायाला राज्याश्रय देणे, कलात्मक, तांत्रिकदृष्ट्या उच्च दर्जाचे चित्रपट निर्माण करण्याच्या प्रयत्नाला उत्तेजन देणे हे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे प्रमुख उद्देश आहेत.

२. मराठी चित्रपट व्यावसायाला मदत करण्याच्या उद्देशाने शासनाने १९६२ सालापासून चित्रपट महोत्सवाच्या आयोजनाला सुरवात केली.

३. मराठी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षाकरीता तसेच चित्रपट सृष्टीत आपल्या अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन इत्यादी अष्टपैलू गुणांनी त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा-या कलाकारांना उत्तेजन देण्याच्या हेतूने प्रतिवर्षी मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले जाते.

४. प्रतिवर्षी राज्य चित्रपट महोत्सवाचे आयोजन हे भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या जयंतीच्या दिवशी म्हणजेच ३० एप्रिल रोजी केले जाते.

५. प्रतिवर्षी जानेवारी महिन्यात चित्रपट निर्मात्यांकडून महोत्सवाच्या प्रवेशिका वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविल्या जातात.

६. राज्य मराठी चित्रपट महोत्सवासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सेन्सॉर संमत झालेल्या पूर्ण लांबीच्या मराठी चित्रपटांना प्रवेश देण्यात येतो.

७. शासन निर्णय क्र-पुरक-२०११/प्र.क्र.१५०/सां.का.०४ दिनांक १३ एप्रिल २०१२ अन्वये परितोषिकांच्या रक्कमेत वाढ करून सन २०१२ -२०१३ पासून शासनातर्फे खालील रक्कमेची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

| अ.क्र. | पुरस्कारांचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| | **तांत्रिक व बालकलाकार विभाग** | | |
| १ | उत्कृष्ट कला दिग्दर्शन<br>**साहेबमामा ऊर्फ फत्तेलाल पारितोषिक** | ५०,००० | प्राथमिक फेरीत तांत्रिक पुरस्कार घोषित करण्यात येतात. |
| २ | उत्कृष्ट छायालेखन<br>**पांडूरंग नाईक पारितोषिक** | ५०,००० | |
| ३ | उत्कृष्ट संकलन | ५०,००० | |
| ४ | उत्कृष्ट ध्वनिमुद्रण | ५०,००० | |
| ५ | उत्कृष्ट ध्वनिसंयोजन | ५०,००० | |
| ६ | उत्कृष्ट वेशभूषा | ५०,००० | |
| ७ | उत्कृष्ट रंगभूषा | ५०,००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | उत्कृष्ट बालकलाकार<br>**गजानन जहागिरदार पुरस्कार** | ५०,००० | |
| **नामनिर्देशन विभाग** | | | |
| ९ | सर्वोत्कृष्ट चित्रपट क्र.१<br>**दादासाहेब फाळके पारितोषिक** | ४,००,००० | प्राथमिक फेरीत सर्वोत्कृष्ट १० चित्रपटांमधून निवड करण्यात येते. |
| १० | सर्वोत्कृष्ट चित्रपट क्र.२<br>**दादासाहेब फाळके पारितोषिक** | ३,००,००० | |
| ११ | सर्वोत्कृष्ट चित्रपट क्र.२<br>**दादासाहेब फाळके पारितोषिक** | २,००,००० | |
| १२ | सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक क्र.१<br>**भालजी पेंढारकर पारितोषिक** | २,००,००० | |
| १३ | सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक क्र.२<br>**भालजी पेंढारकर पारितोषिक** | १,००,००० | |
| १४ | सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक क्र.३<br>**भालजी पेंढारकर पारितोषिक** | ५०,००० | |
| १५ | सामाजिक प्रश्न हाताळणारा चित्रपट<br>**व्ही.शांताराम पारितोषिक** | १,५०,००० | |
| १६ | सामाजिक प्रश्न हाताळणारा चित्रपट दिग्दर्शक<br>**दत्ता धर्माधिकारी पारितोषिक** | १,००,००० | |
| १७ | ग्रामीण प्रश्न हाताळणारा चित्रपट<br>**दादा कोंडके पारितोषिक** | १,५०,००० | |
| १८ | ग्रामीण प्रश्न हाताळणारा चित्रपट दिग्दर्शक<br>**अनंत माने पारितोषिक** | १,००,००० | |
| १९ | सर्वोत्कृष्ट कथा<br>**मधुसूदन कालेलकर पारितोषिक** | ५०,००० | प्रत्येक पुरस्कारास ३-३ नामांकने घोषित करुन अंतिम एका पारितोषिकाची घोषणा कार्यक्रमावेळी करण्यात येते. |
| २० | उत्कृष्ट पटकथा | ५०,००० | |
| २१ | उत्कृष्ट संवाद<br>**आचार्य अत्रे पारितोषिक** | ५०,००० | |
| २२ | उत्कृष्ट गीते<br>**ग.दि.माडगूळकर पारितोषिक** | ५०,००० | |
| २३ | उत्कृष्ट संगीत<br>**अरुण पौडवाल पारितोषिक** | ५०,००० | |
| २४ | उत्कृष्ट पार्श्वसंगीत | ५०,००० | |
| २५ | उत्कृष्ट पार्श्वगायक | ५०,००० | |
| २६ | उत्कृष्ट पार्श्वगायिका | ५०,००० | |
| २७ | उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक | ५०,००० | |
| २८ | उत्कृष्ट  अभिनेता<br>**शाहू मोडक पारितोषिक** | १,००,००० | |
| २९ | उत्कष्ट अभिनेत्री | १,००,००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **स्मिता पाटील पारितोषिक** | | |
| ३० | उत्कृष्ट विनोदी अभिनेत्री<br>**रत्नमाला पारितोषिक** | ५०,००० | |
| ३१ | उत्कृष्ट विनोदी अभिनेता<br>**दामू अण्णा मालवणकर पारितोषिक** | ५०,००० | |
| ३२ | सहायक अभिनेता<br>**चिंतामणराव कोल्हटकर पारितोषिक** | ५०,००० | |
| ३३ | सहायक अभिनेत्री<br>**शांता हुबळीकर व हंसा वाडकर पारितोषिक** | ५०,००० | |
| ३४ | उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता<br>**काशिनाथ घाणेकर पारितोषिक** | ५०,००० | |
| ३५ | उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्री<br>**रंजना देशमुख पारितोषिक** | ५०,००० | |
| ३६ | प्रथम प्रदार्पण चित्रपट निर्माता | १,००,००० | |
| ३७ | प्रथम प्रदार्पण चित्रपट दिग्दर्शक | १,००,००० | |

- पहिल्या तीन उत्कृष्ट ठरलेल्या चित्रपटांची व सामाजिक प्रश्न हाताळणारा उत्कृष्ट चित्रपटांची रोख रक्कमेची पारितोषिक हे चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थांना देण्यात येतील. परंतु या चित्रपटासाठी देण्यात येणारी मानचिन्हे त्या-त्या चित्रपटाच्या निर्मात्यांना देण्यात येतील.
- सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने जाहिर प्रदर्शनासाठी संमत केलेल्या चित्रपटांच्या श्रेयनामावलीमध्ये निर्माता व दिग्दर्शक म्हणून ज्यांच्या नावाचा उल्लेख असेल अशानाच चित्रपटाचा निर्माता आणि दिग्दर्शक समजता येईल. इतर विभागांसाठीही श्रेयनामावीमधील नावाचाच विचार करण्यात येईल.
- निर्माता, दिग्दर्शक किंवा इतर कुठल्याही विभागांमध्ये एकापेक्षा अधिक व्यक्ती असल्या तर श्रेयनामावलीमध्ये ज्याचे नाव असेल त्या प्रत्येक व्यक्तीस मानचिन्ह देण्यात येईल व रोख रक्कमेचे पारितोषिक किंवा पारितोषिक मिळण्यासाठी योग्य व्यक्तीचा मुद्दाम उल्लेख करावयास हवा.
- कुठल्याही भाषेतील चित्रपट आधारलेल्या किंवा त्यांचे भाषांतर असलेल्या किंवा त्यावरून आकार घेतलेल्या कथेचे उत्कृष्ट पारितोषिक दिले जाणार नाही.
- मात्र, चित्रपटाखेरीज कांदबरी, नाटक, लघुकथा व काव्य यावर आधारलेल्या चित्रपटांचा या पारितोषिकांसाठी विचार करण्यात येईल.
- उत्कृष्ट चित्रपटासाठी पारितोषिक मिळविणाऱ्या चित्रपटांचा या पारितोषिकांसाठी विचार करण्यात येईल. उत्कृष्ट चित्रपटासाठी पारितोषिक मिळविणाऱ्या चित्रपटलाच वरील पारितोषिक देण्यात येईल असे नाही.

- राज्य पारितोषिके प्रतिवर्षी ठरलेल्या तारखेला दिली जातील. या नियमात दिलेल्या कालावधीमध्ये सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने जाहीर प्रदर्शनासाठी संमत केलेल्या पूर्ण लांबीच्या सर्व मराठी चित्रपटांना प्रवेशिका पाठविता येतील. प्रवेशिका चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थेने किंवा तिने अधिकार दिलेल्या व्यक्तिने नियमासोबत जोडलेल्या ठराविक नमुन्यात अर्जामध्ये सादर करण्यात याव्यात.
- १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने संमत केलेल्या सर्व पूर्ण लांबीच्या मराठी चित्रपटांना महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवामध्ये भाग घेता येईल.

  प्रवेशिका पाठविण्यासाठी प्रवेश मूल्य ठेवण्यात आले नाही. परंतु महोत्सवात प्रवेशिका पाठविणाऱ्या संस्थेने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मार्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ६५ यांच्याकडे स्वखर्चाने पुरविल्या पाहिजेत. अ) DCP (Digital Cinema Package) 2 Resolution
- एखादा चित्रपट पूर्ण लांबीचा फिचर फिल्म आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय महाराष्ट्र शासन देईल. सामान्यत: जो चित्रपट दुसऱ्या चित्रपटावरून डब केलेला नाही किंवा त्यांच्यावरून तो पुन्हा तयार केला नसेल किंवा त्यांच्यावर तो आधारलेला नसेल तर महोत्सवासाठी त्याची प्रवेशिका स्विकारण्यास तो चित्रपट योग्य ठरविला जाईल. परंतु महाराष्ट्र शासन एखादा चित्रपट दुसऱ्या चित्रपटावर आधारित असला किंवा यावरून तो पुन्हा तयार केला असला आणि तरीही मराठी चित्रपटसृष्टीतील त्याने नवी भर घातली आहे असे समाधानकारक वाटल्यास त्या चित्रपटाची प्रवेशिका स्विकारील. अक्षर वाड्मय पौराणिक व ऐतिहासिक कथा यावर आधारलेल्या कथा केवळ त्यांच्या विषयामुळे आधारित आहे असे मानले जाणार नाही.
- शासन ठराविक मुद्त देऊन राज्य पारितोषिकांसाठी प्रवेशिका मागवील. काही अपवादात्मक प्रसंगी या मुदतीत सूट देण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाने आपल्याकडे राखून ठेवला आहे.
- चित्रपटाची प्रिंट असल्यास आणि प्रसिध्दी साहित्य नेमलेल्या अधिकाऱ्याकडे पाठविण्याचा व परत नेण्याचा सर्व खर्च प्रवेशिका पाठविणाऱ्यांनी करावयाचा आहे. सर्व चित्रपट प्रवेशिका पाठविणाऱ्या संस्था आपल्या स्वत:च्या जोखमीवर प्रिंट पाठवतील. शासन चित्रटाची प्रिंट कळजीपूर्वक सांभाळील. परंतु ती प्रिंट हरवली किंवा त्यामध्ये काही बिघाड झाला तर त्याची जबाबदारी शासन स्वीकारणार नाही. प्रसिध्द साहित्याबाबतची हाच नियम लागू पडेल.
- शासनाने नियुक्त केलेली परीक्षण मंडळे महोत्सवासाठी आलेले सर्व चित्रपट पाहतील. त्यातून महोत्सवातील प्रदर्शनासाठी १० चित्रपटांची निवड करतील.
- परीक्षक मंडळाचे सन्मान्य राहतील. परंतु त्यांना शासनाने मंजूर केल्याप्रमाणे मानधन, प्रवास खर्च इत्यादी दिला जाईल. परीक्षक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करून शासन राज्य पारितोषिक वितरण समारंभामध्ये निकाल जाहीर करील.

- परीक्षक मंडळ योग्य अशा स्थळी आणि वेळी चित्रपटांचे परीक्षण करतील.
- परीक्षक मंडळ हे दोन फेरीमध्ये किंवा आवश्यकतेनुसार ज्यादा फेरीमध्ये काम करतील. प्रथम फेरीत १३ परीक्षक (१३ विभागांसाठी नियुक्त केलेले) तसेच ३ संकलक असे असे एकूण १६ जणांचे प्राथमिक फेरीचे परीक्षक मंडळ सर्व चित्रपटांचे परीक्षण करून खालील तांत्रिक पारितोषिके अंतिमरित्या निश्चित करून त्यांचा निकाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मार्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ६५ यांचेकडे देतील.
  - उत्कृष्ट छायालेखन
  - उत्कृष्ट कलादिग्दर्शक
  - उत्कृष्ट संकलन
  - उत्कृष्ट ध्वनिमुद्रण
  - उत्कृष्ट ध्वनि संयोजक
  - उत्कृष्ट रंगभूषाकार
  - उत्कृष्ट वेशभूषाकार
  - उत्कृष्ट बालकलाकार

- इतर पारितोषिकांसाठी सदर परीक्षक मंडळ तीन/तीन नामनिर्देन (प्रत्येक पारितोषिकासाठी) शिफारस करून प्राथामिक फेरीचा निकला व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ६५ यांचेकडे देतील. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, हे वरील प्राप्त झालेले दोन्ही निकाल पत्रकार परिषदेमध्ये जाहीर करतील.
- अंतिम फेरीसाठी परीक्षकांचे मंडळ (संकलक) असेल आणि ते प्रथम फेरीच्या परीक्षक मंडळाने नामनिर्देशनाची शिफारस केलेल्या चित्रपटाचे पारितोषिक वितरण सभारंभापूर्वी अगोदर परीक्षण करुन प्रत्येक पारितोषिकासाठी एका नावाची अंतिमरित्या निवड करेल.प्रत्येक परितोषिकाचा निकाल स्वतंत्र लिफाफयात सीलबंद करुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, यांचेकडे पारितोषिक वितरण सभारंभाचे दिवशी सुपूर्द करेल. हा निकाल घोषित होईपर्यत गुप्त ठेवण्याची जबाबदारी या परीक्षण मंडळाची राहील.
- शासन महोत्सवासाठी चित्रपटांची केलेली निवड त्याचप्रमाणे जाहीर केलेली राज्य परितोषिक यासंबधिचे निर्णय अंतिम राहतील व स्पर्धकांना ते बंधनकारक राहतील. प्रवेशिका पाठविणाऱ्या

संस्थेचा तिचा चित्रपट महोत्सवामध्ये जाहीररीत्या दाखविण्यास,आक्षेप किंवा विरोध असता कामा नये.

- प्रवेशिकेवर जे निर्मात्याचे नाव नमुद करण्यात आलेले असेल ते अंतिम निर्णया करिता ग्राहय धरण्यात येईल
- प्रवेशिकेमधील कोणतीही माहिती चुकीची आढळल्यास त्या करिता निर्मितीसंस्था जबाबदार असेल
- एखादया संस्थेचा चित्रपट कोणत्याही स्पर्धेकरिता इतर ठिकाणी सहभागी झालेला असल्यास किंवा पारितोषिक मिळाले असल्यास त्याचे पुरावे सोबत जोडण्यात यावे
- शासन ठरवेल त्या स्थळी आणि वेळी पारितोषिके वितरण सभारंभ ठेवला जाईल.
- राज्य पारितोषिक मिळविणाऱ्या व्यक्ती या सभारंभात स्वखर्चाने हजर राहतील.

चित्रपटात काम करणाऱ्या कलाकारांच्या नावाची यादी २५ प्रतीत पुढील तपशिलानुसार देण्यात यावी. सदर यादी चित्रपटाच्या प्रिंट सोबत पाठवावी.

| **अ.क्र** | **चित्रपटातील भूमिकेचे नाव** | **भूमिका सादर करणाऱ्या कलाकाराचे नाव** | **कलाकाराचा पूर्ण पत्ता संपर्क क्रमांकासह पासपोर्ट साईज छायाचित्र** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |